# वुई द लिव्हिंग

मंजिरी जोशी

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**वुई द लिव्हिंग**
मंजिरी जोशी

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
सौ. मंजिरी मोहन जोशी
११, शिवगंगा,
बिववेवाडी, पुणे-४११ ०३७

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४००/-

# वुई द लिव्हिंग

# भाग १

## १

पेट्रोग्राडला कारबॉलिक ॲसिडचा दर्प होता. कधी काळी लाल असलेली एक कळकट गुलाबी पताका पोलादी तारांवर लोंबत होती. उंच खांबावर काचेच्या तावदानांची छत त्या पोलादाइतकंच धुरकटलेलं होतं. गोळीबाराने भोके पडलेल्या त्या छतातून तितकेच धुरकट आकाशाचे तुकडे दिसत होते.

पताकांच्या खाली जळमटं होती आणि त्या जळमटांखाली भलंमोठं पिवळट बिनकाट्याचं घड्याळ. मळकट वस्त्रांतला फिकुटलेल्या चेहऱ्यांचा घोळका फलाटावर गाडीची वाट पाहात उभा होता.

किरा आर्गुनोव्हानी मालगाडीच्या उंबऱ्यावरून पेट्रोग्राडमध्ये प्रवेश केला. विटक्या कपड्यात ती ताठ, निश्चल उभी होती. तिच्या पाठीमागे माणसांनी आणि बोचक्यांनी ठासून भरलेली गाडी होती. बोचकी चादरीत, वर्तमानपत्रांत आणि गोणपाटांत बांधली होती तर माणसं जुन्या कोटांत आणि शालींत गुंडाळलेली. बोचक्यांचा वापर बिछाने म्हणून झाल्यामुळे ती आपला आकार हरवून बसली होती; आणि माणसं आपली व्यक्तिमत्त्वं हरवून बसली होती.

रखडत खुरडत गाडी थांबली. 'क्रीमा'पासून 'पेट्रोग्राड' पर्यंतच्या तीन दिवसांच्या प्रवासाला या गाडीला तीन आठवडे लागले होते.

१९२२ मध्ये इतर अनेक गोष्टींप्रमाणे रेल्वेगाड्याही सुरळीत नव्हत्या. क्रांती संपली होती. पांढऱ्या सेनेच्या शेवटच्या नावनिशाण्या पुसून झाल्या होत्या; पण सारी सूत्रं हाती घेणाऱ्या लाल मुठीतून रेल्वेचे रूळ आणि तारा मात्र निसटून विस्कळीत लोंबत होत्या. तशी तिथे कोणतीच निश्चित वेळापत्रके नव्हती. गाडी केव्हा येईल आणि कधी सुटेल हे कुणालाच माहीत नसे. गाडी येत असल्याच्या पुसटश्या आवईने–सुद्धा चिंतातुर प्रवाशांची झुंडच्या झुंड त्या दिशेने धावत सुटे आणि गाडीच्या फलाटावर वाट पाहात बसे. गाडी कदाचित एक मिनिटात येई किंवा एक आठवड्यानंतर. वाळके पाव आणि सूर्यफुलाच्या बिया चघळत प्रवासी चिकाटीने वाट पाहात आणि गाडी फलाटाला लागली की माणसं गर्दी करून जागा मिळेल तिथे गोचिडीसारखी चिकटत. कधी त्यांचं सामान हरवायचं तर कधी मुलं हरवायची आणि जितके आत घुसतील त्यांना घेऊन कोणतीही सूचना न देता गाडी चालती व्हायची.

किरा आर्गुनोव्हानं प्रवासाची सुरुवात काही मालगाडीतून केली नव्हती. तिसऱ्या वर्गाच्या प्रवासी डब्यातलं एक टेबल तीला मिळालं होतं. जागेअभावी किराचे पाय तिच्या वडिलांच्या मांडीवर होते.

अलेक्झांडर दिमित्रीविच आर्गुनोव्हा. एका कोपऱ्यात थकून रेलला होता. त्याच्या लाल सुजट डोळ्यांच्या पापण्या जडावल्या होत्या. अधून मधून तोंड उघडं राहिल्याची जाणीव झाली की तो खडबडून जागा होई. गोणपाटाच्या कापडाच्या त्याच्या शर्टाच्या पाठीवर 'युक्रेनचे बटाटे' असा शिक्का अजूनही दिसत होता. हे काही मुद्दाम केलेले वेषांतर नव्हते, सध्या त्याची मालमत्ता तेवढीच होती; पण त्याला खरी काळजी होती ती आपल्या चष्म्याच्या काड्या सोन्याच्या आहेत हे कुणाच्या ध्यानात येत नाही ना याची.

त्याच्या शेजारीच चेंगरून, ताठ मानेने हातातले पुस्तक नाकाच्या शेंड्यापाशी नेऊन वाचणारी त्याची बायको 'गॅलिना पेट्रोव्हना' बसली होती. आपल्या सहप्रवाशांना हातातले पुस्तक फ्रेंच असल्याचा सुगावा न लागू देता. अधूनमधून ती पायाखालच्या बोचक्यातले सगळ्यात किमती बोचके जागेवर आहे की नाही ते चाचपत होती. युद्धापूर्वी व्हिएन्नात खरेदी केलेली 'लेस ची अंतर्वस्त्रे' आणि 'चांदीची भांडी' होती त्यात. बाकाखाली घोरत पडलेल्या एका सैनिकाने त्या गाठोड्याचा उपयोग उशी म्हणून केल्यामुळे गॅलिना मनात चरफडत होती.

'लिडीया'ला – 'आर्गुनोव्हां'च्या थोरल्या मुलीला जाण्यायेण्याच्या वाटेत एका बोचक्यावरच बसावं लागलं होतं; पण ती प्रत्येकाला आपल्याला असल्या भिकार प्रवासाची सवय नसल्याची जाणीव करून देत होती. काळजीपूर्वक रफू केलेले हातमोजे काढून जवळच्या 'यू–डी कोलन' चे एक दोन थेंब ती मधूनच हातावर घ्यायची आणि फ्रेंच कादंबरीआड दडलेली आपल्या आईची आशाळभूत नजर पाहताच बाटली दडवून ठेवायची.

आर्गुनोव्हा कुटुंबाला पेट्रोग्राड सोडून चार वर्षे झाली होती. चार वर्षांपूर्वी आर्गुनोव्हांची कापड गिरणी जनतेच्या नावाने राष्ट्रीयीकृत झाली. जनतेच्या नावाने बँकादेखील राष्ट्राची संपत्ती म्हणून जाहीर झाल्या; आणि आर्गुनोव्हांच्या तिजोऱ्या फोडल्या गेल्या. मोठमोठ्या मेजवान्यांत घालून मिरवलेली गॅलिनाची हिरेजडित कंठी न जाणे कुणी लुटली, त्या दिवसांत–जेव्हा अनामिक भीतीचे सावट अंधारातल्या धुक्यासारखे साऱ्या शहरावर पसरलेले होते, जेव्हा अपरात्री अचानक बंदुकीच्या फैरी झडत आणि खळखळाट होऊन दुकानांच्या काचा फुटत, तेव्हा आर्गुनोव्हांच्या सामाजिक वर्तुळातले एक एक जण शेकोटीलगत ठेवलेल्या बर्फाच्या खड्यांसारखे एक एक करून वितळून जात होते.

आर्गुनोव्हा कुटुंबाजवळ त्यांच्या राजेशाही घराच्या दगडी भिंतीत थोडेसे जडजवाहीर, बरीचशी रक्कम आणि दाराच्या छोट्याशा आवाजानिशी हृदयात होणारी धडधड इतकेच शिल्लक होते. आणखी शिल्लक होता शहर सोडून जाण्याचा एकमेव पर्याय.

या दिवसांत पेट्रोग्राडमधला क्रांतीचा जोर ओसरला होता. लाल सेनेचा अनिवार्य विजय प्रस्थापित झाला होता. मात्र दक्षिण रशियात यादवी युद्ध जोमाने सुरू होते. दक्षिण पांढऱ्या सेनेच्या ताब्यात होती. हे शाही सैन्य देशभर तुटक्या फुटक्या रेल्वेमार्गामधून खेडोपाडी विखुरलेले होते. तिरंगी ध्वज आणि शत्रूचा तिटकारा बाळगून होते; पण त्या शत्रूच्या महत्त्वाची मात्र या सेनेला मुळीच जाण नव्हती.

आर्गुनोव्हांनी 'पेट्रोग्राड' सोडून 'क्रीम'ला प्रयाण केले. दक्षिणेकडे राहून लाल गळफासातून राजधानी मुक्त होण्याची वाट पाहण्याचा त्यांचा बेत होता. आपल्या पाठीमागे त्यांनी चमचमत्या झुंबरांचे ऐनेमहाल आणि सुगंधी वस्त्रे सोडली होती. 'केमेनस्ट्रोव्हस्कीत---- पेट्रोग्राडमधील उच्चभ्रूंची वस्ती!'

त्यांनी चार वर्षं सायक्रिनमिश्रित चहा आणि आळशीच्या तेलात परतलेले कांदे खाऊन बॉम्बवर्षावाच्या संगतीत काढली. रोज सकाळी शहरावर लाल निशाण असेल की तिरंगी ही काळजी. 'क्रीमा'ने सहा वेळा निशाणं बदलली. अखेर १९२१ मध्ये अनिश्चितता संपली. पांढऱ्या समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत, पोलंडच्या सीमेपासून पिवळ्या चीनपर्यंत 'इंटरनॅशनल'ची धून विजयोन्मादाने वाजत असतानाच किल्ल्या खुळखुळल्या आणि जगाची दारे रशियाला बंद झाली.

आर्गुनोव्हांनी पेट्रोग्राड सोडलं ते बेफिकीरीतच. गॅलिना पेट्रोव्हानाने अलेक्झांडर दिमित्रीविचला आपला हिवाळ्याचा कोट घेऊ दिला नव्हता. ती हसून म्हणाली होती, 'त्याला वाटतंय वर्षभर टिकेल हे सारं!' पण 'हे सारं' पाच वर्षं टिकून होतं. आर्गुनोव्हा कुटुंब थकून, अगतिक शांतपणाने पेट्रोग्राडला परत निघाले, शक्य असेल तर नवं जीवन सुरू करायला. अठरा वर्षांच्या किराच्या मनात पेट्रोग्राड होतं. तिच्या आसपासही तोच विषय चालू होता–

'पेट्रोग्राडमध्ये सुकी मासळी मिळते म्हणे सिटीझन?'

'आणि सूर्यफुलांचे तेल–'

'खरंखुरं? हँ, काहीतरीच.'

'स्टेपका, तुझं डोकं माझ्यापुढे खाजवू नको बरं. जा तिकडे खिडकीपाशी.'

'तिथल्या सहकार भांडारात म्हणे बटाटे मिळतात. बटाटे जरा गारठलेले असतात, पण खरे बटाटे.'

'नागरिकहो, तुम्ही कधी कॉफीपावडरची सांदणं खाल्ली आहेत? काकवीशी छान लागतात.'

'गुड्घा गुडघा चिखल-त्या पेट्रोग्राडात!'

'तीन तीन तास सहकारी भांडारात रांगा लावाव्यात तर कदाचित अन्न मिळतं.'

'पण मी तर ऐकलंय पेट्रोग्राडमध्ये N.E.P. आहे?'

'N.E.P. ते काय बुवा?'

'ऐकलं नाहीत कधी?-जागरूक नागरिक दिसत नाहीत तुम्ही.'

'बंधूंनो, पेट्रोग्राड, N.E.P. आणि खासगी दुकाने.'

'पण जर तुम्ही साठेबाज नसाल तर उपाशी मराल. पण जर असाल आणि खासगी दुकानात जाऊन मनात येईल ते घेतलंत-तर सांभाळून असा; पण साठेबाज नसाल तर खासगी दुकानांसाठी पैसा कुठून आणणार? मग राहा रांगेत उभे!'

'पण सहकारी भांडारात बाजरीदेखील मिळते म्हणे.'

'शेवटी उवा सोडून बाकी सगळ्यांची पोटं रिकामी ती रिकामीच.'

'तुम्ही आधी डोकं खाजवणं थांबवा पाहू.'

'पेट्रोग्राडला पोहोचल्यावर मी गव्हाची खीर खाणार.'

'गरम पाणी आणि साबणाने आंघोळ करायला मिळाली तर काय बहार येईल?'

लाल रुमाल बांधलेल्या एका बाईने पुरचुंडी सोडली आणि सुक्या मासळीचा तुकडा बाहेर काढला. वरच्या बर्थवरच्या माणसाला ती म्हणाली, 'बाबारे, जरा पाय बाजूला घे-खाऊ दे मला.' बूट हलले नाहीत. ती बाई बाजूच्या फर कोटातल्या बाईला कोपराने ढोसत म्हणाली. 'पाहा पाहा, आम्हा कष्टकऱ्यांची यांना काही जाण आहे का पाहा? माझा काही फरचा कोट नाही-नाहीतर ही सुकी मासळी कशाला खाल्ली असती मी? चांगला पांढराशुभ्र ब्रेड खाल्ला असता.'

'पांढरा ब्रेड? भलतंच काय बोलताय बाई? माझा पुतण्या तर लाल सेनेत आहे आणि पांढरा ब्रेड? मी स्वप्नातसुद्धा ऐकलं नाही असलं काही.'

'अस्सं? पण ही मासळी तरी नक्कीच खाणार नाही तुम्ही शिष्ट लोकं. हवाय एक तुकडा?'

'अं-हो-आभार. खरी तशी मला भूकच आहे.'

'असेल तर-तुम्हा बूर्झ्वांचं सगळं पाठ आहे मला. आम्हा कष्टकऱ्यांच्या तोंडची भाकर ओढून घ्यायची संधीच शोधत असता तुम्ही. माझ्या तोंडचा घास नाही मिळायचा.'

गाडीत कुजक्या लाकडांची दुर्गंधी येत होती. त्यात तो अर्धमिटल्या दारातून येणारा वास- फर कोटातली बाई हळूच उठून त्या दाराकडे गेली. आत जाऊन

कपड्यात लपवलेला एक आख्खा बटाटा तिने बाहेर काढला आणि भराभर खायला सुरुवात केली.

रात्र झाली की या टोकापासून ते त्या टोकापर्यंत दोन कंदील थरथरत फिरायचे. डब्याच्या दारावर लाथ बसून ते उघडलं जायचं; आणि चकचकीत पितळी बटणं आणि संगिनी अंगावर खेकसायच्या-'कागदपत्रं?' गॅलिना पेट्रोव्हनाने कापऱ्या हाताने आणि कृतज्ञ भावाने एक चुरगाळलेला कागद पुढे केला. कागदावर अलेक्झांडर आर्गुनोव्हा, गॅलिना आणि मुली-लिडिया-२८ आणि किरा-१८ यांना पेट्रोग्राडला जाण्याचा टंकलिखित परवाना होता.

एके रात्री गाडी अचानक थांबली. सकाळी रेडक्रॉसधारी माणसे धावली. त्या गलक्यात पुढे जाऊन पाहायला गेलेला एक माणूस सांगू लागला, 'एक मूर्ख मजूर बाई, दोन डब्यांच्या मधून सांध्यावरून प्रवास करीत होती, पडू नये म्हणून पाय बांधून दमून झोपली आणि फरपटली गेली-डोकंच तुटलं-कुठून बघायला गेलो-' पुढच्या छोट्या स्टेशनवर गाडी थांबली ती कायमचीच. काही वर्षांत दुरुस्ती किंवा तपासणी काहीच न झाल्यामुळे गाड्या अशा अवस्थेला आल्या होत्या की मोडायच्या तेव्हा दुरुस्ती अशक्य व्हायची. उतारूंना डबे खाली करायला सांगितले गेले. इतर आधीच ठेचून भरलेल्या गाड्यात त्यांना शिरायचं होतं- जमलं तर....

शेवटी एकदाची आर्गुनोव्हांना एका मालगाडीत जागा मिळाली. गॅलिना आणि लिडियाने ईश्वराचे आभार मानले. रशियाच्या कुरणांतून आणि दलदलीतून गाडी सरपटत होती. मागे धुराचा पडदा तयार होत होता. उतरत्या छतांवर बसलेले सैनिक क्रांतीची गाणी गात होते. धुराबरोबरच ती गाणीही वाहत होती.

पेट्रोग्राडमध्ये मोठा घोळका गाडीची वाट पाहात होता. धापा टाकत गाडी स्टेशनात शिरली. बेडौल कपड्यांच्या आतल्या शरीरात सततच्या तणावाने आणि अखंड झगड्याने कसलीतरी अनैसर्गिक शक्ती संचारली होती. -त्यांचे चेहरे कठोर आणि शिणलेले होते. त्या चेहऱ्यांमागे उंच जाळीदार खिडक्या होत्या. त्यामागे शहर.

किरा प्रवाशांच्या रेट्याने पुढे लोटली गेली. उतरताना ती क्षणभर थबकली. जणू ती या पावलांचं महत्त्व लक्षात घेत होती. एक निमिषभर हवेत तरंगून तिचा रापलेला पाय लाकडी फळकुटांना टेकला.

किरा आर्गुनोव्हानं पेट्रोग्राडमध्ये प्रवेश केला.

## २

जगातील कामकऱ्यांनो एकत्र या!

प्लास्टरचे टवके उडालेली ती भिंत त्वचारोग झाल्यासारखी दिसत होती. आणि

त्यावर नव्यानेच रंगवलेल्या लाल अक्षरांतल्या घोषणा होत्या. 'कष्टकऱ्यांची सार्वभौमता चिरायू होवो!' 'जे आमच्या सोबत नाहीत ते आमच्या विरुद्ध आहेत!' या भिंतीला टेकून एक तरुण उभा होता. चुरगाळलेली टोपी घातलेला तो तरुण शून्यात नजर लावून सूर्यफुलाच्या बियांची टरफलं ओठाच्या कोपऱ्यातून थुंकीत होता. एका जुन्या रांजणाला पत्र्याचं ओगराळं साखळीने बांधलं होतं. त्यावर पाटी होती 'उकळलेले पाणी. कॉलऱ्यापासून सावध राहा!'

लूत भरलेले एक कुत्रे अन्नाच्या शोधार्थ हिंडत होते; आणि बुटांच्या टापा आणि झग्यांच्या सळसळाटातून एक हंबरडा येत होता; तो धड माणसाचा वाटत नव्हता की धड जनावराचा. एक बाई गुडघ्यावर सरपटत सिगारेटची थोटकं आणि बियांची टरफलं मिसळलेली पोत्यातून सांडलेली बाजरी गोळा करीत होती. किराला खिडक्यांपलीकडून ट्रामची परिचित घंटी ऐकू आली, ती स्वत:शी हसली.

'किरा–' तेवढ्यात गॅलिना ओरडली, 'किरा, कुठे आहेस तू? सामान कोण उचलणार?' गॅलिना भोवती माशांसारखे घोंघावणारे हमाल हाकलत उभी होती. शेवटी एकदाचं न पेलणारं सामान वाहात आर्गुनोव्हा कुटुंब पेट्रोग्राडच्या रस्त्यावर आलं. स्टेशनच्या प्रवेशद्वारावर भले मोठे खुरपे आणि हातोड्याचे सोनेरी चिन्ह होते. त्याच्या दोन बाजूंना फलक होते. एकावर एक दांडगा कामगार आपल्या प्रचंड बुटांनी छोटे छोटे महाल तुडवताना दाखविला होता. त्याच्या स्नायूंनी टरटरून फुगलेला हात लाल सूर्याला अभिवादन करीत होता. सूर्यावर शब्द होते, 'बंधूंनो, आपण नव्या आयुष्याचे शिल्पकार आहोत.' दुसऱ्या बाजूच्या फलकावर एक प्रचंड 'ऊ' होती. त्यावर लाल अक्षरात लिहिलं होतं. 'उवा रोगराई पसरवतात. नागरिकहो, टायफसच्या मुकाबल्यासाठी एकजूट करा!'

पेट्रोग्राडची दारं झामेस्की चौकात उघडायची. एका खांबावर या चौकाचं नवं नाव होतं. 'उदयाचा चौक.' आभाळसुद्धा दुरुस्तीला आल्यासारखं ठिबकत होतं. एका दुकानावर पाटी होती 'किराणामाल', त्या दुकानाबाहेरची रांग कोपऱ्यावरून वळून पुढे गेली होती.

'चला आलो एकदाचे परत', अलेक्झांडर दिमित्रीविच म्हणाला.

'किती नवलाईचं आहे सारं–', किरा म्हणाली.

'नेहमीप्रमाणेच चिखल.' लिडिया म्हणाली.

'टॅक्सी करावी लागणार, काय हा खर्च!' गॅलिना उसासली.

नेव्हस्की प्रॉस्पेक्टचा लांबरुंद रस्ता म्हणजे जणू पेट्रोग्राडचा कणा होता. दूरवर आरमाराच्या कचेरीवरचा सोनेरी मनोरा करड्या धुक्यात नि:शब्द अभिवादन करणाऱ्या हातासारखा दिसत होता.